साप्ताहिक
भारत सरकार मान्यताप्राप्त
# अनंत विचार
संपादक : सचिन हरी आदापुरे मो.नं.९८५००२७६४३

WEEKLY
ANANT VICHAR
वेब पोर्टल | युट्युब न्यूज नेटवर्क
Editor : SACHIN HARI ADAPURE
CELL NO - 9850027643
nageshadapure1978@gmail.com
अनंत विचार चा अंक WHATSAPP वर वाचण्यासाठी आपला WHATSAPP नंबर व नांव वरील नंबरवर SMS करावा

वर्ष : तिसरे | वार:मंगळवार | दि.१७ डिसेंबर २०२४ | किंमत ५ रुपये | पाने : ४ | अंक: १८ | R.N.I.No.-MAH-MAR-2022/83591 | PPR/83/2023-2025

## शेवटच्या घटकापर्यंत पीएम सूर्यघर योजनेची माहिती पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावेत - जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

### जिल्ह्यात रूप-टॉप सोलरचे ७९२६ अर्ज मंजूर तर २११५ चे काम पूर्ण

सोलापूर : पीएम सूर्यघर योजना ही भारत सरकारने सुरू केलेली एक महत्वकांक्षी योजना आहे. या अंतर्गत देशभरातील एक कोटी कुटुंबांना दरमहा ३०० युनिट पर्यंत मोफत वीज पुरवठा करण्याचे उद्दिष्ट आहे. तरी ही योजना सोलापूर जिल्ह्यातील शेवटच्या घटकापर्यंतच्या लाभार्थ्यापर्यंत पोहोचावी यासाठी वीज वितरण कंपनीने योग्य नियोजन करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पीएम सूर्यघर योजना २०२४ जिल्हास्तरीय समितीच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता सुनील माने, कार्यकारी अभियंता आशिष मेहता, रमेश राठोड, महाऊर्जा जिल्हा व्यवस्थापक प्रसन्न चित्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत इशादीन शेळकंदे उपस्थित होते. जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की पीएम सूर्य घर योजना अंतर्गत आज रोजी पर्यंत महावितरणच्या पोर्टलवर ७९६९ अर्ज प्राप्त असून त्यातील ७९२६ अर्जांना महावितरण्य मंजुरी दिलेली आहे व ५८११ सोलरचे काम सुरू असून २११५ सोलर चे काम पूर्ण झालेले आहे तरी उर्वरित रूप टॉप सोलर चे काम त्वरित मार्गे लावावे. व जिल्ह्यातील अन्य पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचण्यासाठी वीज वितरण कंपनीने मोठ्या प्रमाणावर नागरिकांचे प्रबोधन करावे. गावोगावी जाऊन आपल्या लाईन स्टाफ मार्फत या योजनेचे महत्त्व नागरिकांना पटवून द्यावे. या योजनेअंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात काम करणाऱ्या वेंडरची स्वतंत्र बैठक आयोजित करावी, असेही त्यांनी सुचित केले.

सद्यस्थितीत या योजनेची बँकाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या बँक निहाय जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यांच्याकडून उपलब्ध करून घ्यावी. तसेच सर्व बँकांशी एक स्वतंत्र बैठक या योजनेच्या अनुषंगाने घेऊन त्यांना या योजनेअंतर्गत ची प्रकरणे विहित पद्धतीने त्वरित मंजूर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले.

प्रारंभी वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता सुनील माने यांनी पीएम सूर्यघर योजना जिल्ह्यात कशा पद्धतीने राबवली जात आहे याविषयी माहिती दिली. वीज वितरण कंपनीकडून २११५ काम पूर्ण झालेल्या रूट ऑफ सोलर च्या माध्यमातून ७.६५ किलो वॅट क्षमतेची वीज निर्मिती झाल्याचे सांगितले. तसेच जिल्ह्याच्या प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांना योजनेचा लाभ देण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे सांगितले. तसेच सौर ग्राम योजनेअंतर्गत चिंचणी (पंढरपूर), धानोरे (माळशिरस), हिपळे (दक्षिण सोलापूर) या गावांची निवड करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिनांक १३ फेब्रुवारी २०२४ रोजी पीएम सूर्य घर मोफत वीज योजनेची घोषणा केली. ही योजना रुफ टॉप सोलर योजना आहे. या प्रकल्पाचे उद्दिष्ट दरमहा ३०० युनिट पर्यंत मोफत वीज पुरवठा करून १ कोटी घरांना प्रकाश देण्याचे उद्दिष्ट आहे. या योजनेअंतर्गत शासन अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करेल त्यांना सवलतीच्या दरात बँक कर्जही दिले जाईल यासाठी एक राष्ट्रीय ऑनलाईन पोर्टल तयार केले जाईल. यामध्ये सर्व प्रकारच्या सुविधा एकत्रित केल्या जातील एक प्रकारे हे पोर्टल इंटरफेस सारखे कार्य करणार आहे. या योजनेचा शेवटच्या घटकापर्यंत प्रचार करण्यासाठी शहरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायतींना त्यांच्या भागात ग्रुप टॉप सोलर सिस्टिमला प्रोत्साहन देण्यासाठी प्रबोधित करण्यात येईल. या शिवाय उत्पन्न वाढवणे, विज बिल कमी करणे आणि लोकांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा योजनेचा उद्देश आहे. पी एम सूर्यघर योजना ही भारत सरकारने सुरू केलेली अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना आहे.

## ३९ जणांचा शपथविधी; २५ नवे चेहरे, ११ जणांना डच्चू

नागपूर : राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाचा बहुप्रतिक्षीत विस्तार आज संपन्न झाला. नागपूरातील राजभवनात दिमाखदार सोहळ्याचं आयोजन केलं होतं. उद्यापासून हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होत आहे. त्याच्या एक दिवस आधी महायुतीच्या मंत्रिमंडळ विस्तार करण्यात आला. महायुतीचं सरकार सत्तेवर आल्यानंतर १० दिवसांनंतर मंत्रिमंडळ विस्तार संपन्न झाला.महायुतीच्या ३९ आमदारांनी आज मंत्रिपदाची शपथ घेतली. यामध्ये भाजपच्या सर्वाधिक १९ जणांचा समावेश आहे. तर शिवसेनेच्या ११, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या ९ जणांचा समावेश आहे. गेल्या मंत्रिमंडळातील काही जणांना डच्चू देत यंदा महायुतीमधील तिन्ही पक्षांनी मिळून २५ नवे चेहरे दिले आहेत.

शपथ घेतलेल्या आमदारांची संपूर्ण यादी–

१. चंद्रशेखर बावनकुळे (भाजप),२. राधाकृष्ण विखे पाटील (भाजप),३. हसन मुश्रीफ (राष्ट्रवादी),४. चंद्रकांत पाटील (भाजप),५. गिरीश महाजन (भाजप),६. गुलाबराव पाटील (शिवसेना),७. गणेश नाईक (भाजप),८. दादा भुसे (शिवसेना),९. संजय राठोड (शिवसेना),१०. धनंजय मुंडे (राष्ट्रवादी),११. मंगलप्रभात लोढा (भाजप),१२. उदय सामंत (शिवसेना),१३. जयकुमार रावल (भाजप),१४. पंकजा मुंडे (भाजप),१५. अतुल सावे (भाजप),१६. अशोक उईके (भाजप),१७. शंभुराज देसाई (शिवसेना),१८. आशिष शेलार (भाजप),१९. दत्तात्रय भरणे (राष्ट्रवादी काँग्रेस),२०. अदिती तटकरे (राष्ट्रवादी काँग्रेस),२१. शिवेंद्रराजे भोसले (भाजप),२२. माणिकराव कोकाटे (राष्ट्रवादी काँग्रेस),२३. जयकुमार गोरे (भाजप),२४. नरहरी झिरवळ (राष्ट्रवादी काँग्रेस),२५. संजय सावकारे (भाजप),२६. संजय शिरसाट (शिवसेना),२७. प्रताप सरनाईक (शिवसेना),२८. भरत गोगावले (शिवसेना),२९. मकरंद पाटील (राष्ट्रवादी),३०. नितेश राणे (भाजप),३१. आकाश फुंडकर (भाजप),३२. बाबासाहेब पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस),३३. प्रकाश आबिटकर (शिवसेना),३४. माधुरी मिसाळ (भाजप),३५. आशिष जैस्वाल (शिवसेना),३६. पंकज भोयर (भाजप),३७. मेघना बोर्डीकर (भाजप),३८. इंद्रनील नाईक (राष्ट्रवादी काँग्रेस),३९. योगेश कदम (शिवसेना).

कोणकोणते नवे चेहरे?– चंद्रशेखर बावनकुळे, गणेश नाईक, जयकुमार रावल, पंकजा मुंडे, अशोक उईके, आशिष शेलार, दत्तात्रय भरणे, शिवेंद्रराजे भोसले, माणिकराव कोकाटे, जयकुमार गोरे, नरहरी झिरवळ, संजय सावकारे, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, भरत गोगावले, मकरंद पाटील, नितेश राणे, आकाश फुंडकर, बाबासाहेब पाटील, प्रकाश आबिटकर, माधुरी मिसाळ, आशिष जैस्वाल, पंकज भोयर, मेघना बोर्डीकर, इंद्रनील नाईक.

कोणाकोणाला डच्चू?– सुधीर मुनगंटीवार, विजयकुमार गावित, रविंद्र चव्हाण, सुरेश खाडे, तानाजी सावंत, अब्दुल सत्तार, दीपक केसरकर, छगन भुजबळ, दिलीप वळसे–पाटील, अनिल पाटील, संजय बनसोडे.

## सोलापूर जिल्ह्याला पुन्हा एकदा मंत्रीपदाची हुलकावणी; जिल्ह्याला पुन्हा बाहेरचाच पालकमंत्री

सोलापूर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारमधील नव्या मंत्र्यांचा शपथविधी रविवारी उपराजधानी नागपुरात पार पडला. मात्र सोलापूर जिल्ह्यात भाजपचे पाच आमदार असताना यापैकी एकाही आमदाराची मंत्रिपदासाठी वर्णी लागली नसल्याने पुन्हा एकदा सोलापूर जिल्हा मंत्रीपदापासून वंचित राहिला आहे. जिल्ह्याच्या विकासाला आणि भाजपच्या संघटनेला फटका बसलेल्या सोलापूर जिल्ह्याला नव्या मंत्रिमंडळात स्थान मिळेल, अशी अपेक्षा होती. मागील ५ वर्षांत महाविकास आघाडी आणि महायुती दोघांनी देखील सोलापूरला मंत्रिपदपासून वंचित ठेवले होते. यावेळी देखील सोलापूर जिल्ह्याला एकही मंत्रिपद मिळाले नसल्यामुळे नाराजी व्यक्त केली जात असून पुन्हा एकदा जिल्ह्याला बाहेरचाच पालकमंत्री मिळणार हे स्पष्ट झाले आहे.

सलग दोन वेळा पाच आमदार निवडून देऊनही सोलापूरला भारतीय जनता पक्षाकडून मंत्रिपदाची संधी मिळू शकलेली नाही. जिल्ह्यातील पाचपैकी एकाही आमदाराला मंत्रिपदाची संधी मिळाली नसल्याने गेल्या पाच वर्षांप्रमाणेच सोलापूरला स्थानिक पालकमंत्री मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे २०१९ पासून सोलापूरला पहिल्या टप्प्यात मंत्रिपदाची संधी मिळू शकलेली नाही. विशेष म्हणजे एकाच वेळी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री लाभलेल्या सोलापूरला आता मंत्रिपदासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. विधानसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यातून एकट्या भाजपचे पाच आमदार निवडून आले आहेत. त्यामध्ये माजी मंत्री विजयकुमार देशमुख,सुभाष देशमुख, जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी,देवेंद्र कोठे आणि समाधान आवताडे यांचा समावेश आहे. गेल्या वेळीही सोलापूरकरांनी पाच आमदार निवडून दिले होते. या निवडणुकीत त्याचीच पुनरावृत्ती करत पाच आमदारांचे दान महायुतीच्या झोळीत टाकले आहे. मात्र,मंत्रिमंडळ विस्तारात सोलापूरला पुन्हा एकदा डावलण्यात आले आहे. भाजपकडून माजी मंत्री सुभाष देशमुख,विजयकुमार देशमुख, सचिन कल्याणशेट्टी हे प्रबळ दावेदार मानले जात होते.



दि. १२/१२/२०२४ रोजी पंढरपूरचे सुपुत्र डॉ. श्रीनिवास बुमरेला यांच्या कन्सेप्ट ऑफ बायोफार्मास्युटिक्स अँड फार्माकोकायनेटिक्स या पुस्तकाचे अधिकृतरित्या उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर यांच्या शुभहस्ते झाले. या उद्घाटन प्रसंगी स्वा. रा.ती म.वि.नांदेडचे प्रशासकीय कर्मचारी डी.डी पवार रजिस्टर (प्र.), एम. के. पाटील सायन्स आणि टेक्नॉलॉजी विभागप्रमुख, मोहम्मद शकील अब्दुल करीम लेखापाल (प्र.) उपस्थित होते.

## पंढरपूर अर्बन बँकेच्या व्यवहारावर कोणताही परिणाम नाही–मुळे

### शाखा बारामती येथील प्रकार...अपहार,चोरीबाबत बँकेकडे विमा पॉलिसी कार्यरत

पंढरपूर : पंढरपूर अर्बन बँकेच्या बारामती शाखेमधील व्यवस्थापकाने केलेल्या नऊ कोटी अपहाराचा कोणताही परिणाम बँकेच्या व्यवहारावर होणार नसून खातेदारांची सर्व रक्कम सुरक्षित आहे. याबाबत बँकेची सर्व रक्कम वसुलीची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती बँकेचे चेअरमन सतीश मुळे यांनी दिली.




पंढरपूर बँकेच्या बारामती शाखेचा व्यवस्थापक अमित प्रदीप देशपांडे याने आपल्या पदाचा गैरवापर करत नऊ कोटी तीन लाख रुपयाचा अंतर्गत बँकिंग फसवणूकीचा आर्थिक गैरव्यवहार केला आहे. याप्रकरणी बँकेने बारामती शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून देशपांडे याने गुन्ह्याची कबुली देखील दिली आहे. बँकेच्या अंतर्गत तपासणीमध्ये एक महिन्यापूर्वी सदर आर्थिक अपहार केल्याची माहिती समोर आली. यानंतर तातडीने बँकेच्या अधिकाऱ्यांनी देशपांडे याची व त्याच्या कुटुंबातील सदस्यांची सर्व खाती गोठवली आहेत. हा प्रकार फक्त बारामती शाखेपुरता मर्यादित असून कोणत्याही ग्राहकांच्या खात्याशी संबधित नाही. यामुळे बँकेच्या कोणत्याही खातेदाराचे नुकसान झाले नाही. शाखास्तरावर बनावट नावाची खाते काढून व्यवस्थापक देशपांडे याने हा प्रकार केला आहे. यामध्ये कोणत्याही ग्राहकांचे नुकसान झाले नसलेचे मागील १५–२० दिवसांचे तपासणी दरम्यान निश्चित झाले आहे. बँकेची अशा बाबीसाठी स्वतंत्र विमा पॉलिसी कार्यरत आहे. यामुळे बँकेच्या व्यवहारावर याचा कोणताही परिणाम होणार नसल्याचे बँकेच्या व्हाईस चेअरमन माधुरी जोशी यांनी सांगितले. दरम्यान राज्यात पंढरपूर अर्बन बँकेच्या ३० शाखा असून २५०० कोटी–हुन अधिक व्यवसाय आहे. झालेल्या अपहारामुळे सभासदांनी घाबरण्याचे कोणतेही कारण नसून बँकेची आर्थिक परिस्थिती मजबूत आहे. याबाबत आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली असल्याचे बँकेचे सीईओ उमेश विरधे यांनी स्पष्ट केले.

# संपादकीय

## वेगाला आवरा, जीवाला सावरा !

जगणं माहीत असणाऱ्यांना वागणं कसं असावं हा प्रश्न कधीच पडत नाही. मग वाहन चालविताना ते जगणं जाते कुठे? तेव्हा तर प्रत्येक जण वाऱ्याशी बोलतच वायुवेगाने समोर जात असतो. येथेच गणित चुकते आणि होत्याचे नव्हते होऊन जाते. वाढत असलेले रस्ता अपघात आज खरोखरच चिंतेचा आणि मंथनाचा विषय ठरला आहे. नागपुरात अपघातग्रस्ताचा जीव वाचावा म्हणून वाहतूक पोलिसांनी दुचाकीवर मागे बसणाऱ्यांनाही हेल्मेटची सक्ती केली आहे. एका अर्थाने ही सक्ती योग्य वाटत असली, तरी त्यालाही अनेक कंगोरे आहेत. हेल्मेट घातले म्हणजे जीव वाचतो असे सरसकट प्रशासनाचे म्हणणे हास्यास्पद आहे. आज बाजारात जे काही हेल्मेट उपलब्ध आहेत, ते डोक्याची किती सुरक्षा करतील याची काहीही हमी नाही. शिवाय हेल्मेट घाला आणि वाहतूक नियम पायदळी तुडवीत समोर जा, अशीच कृती १०० पैकी ९९ चालकांची आहे. अपघातमुक्त महाराष्ट्र करायचा असेल तर शहरात आणि ग्रामीण भागात प्रथमत: वाहनांच्या वेगावर नियंत्रण आणावे लागेल. अपघातात मरण पावणाऱ्यांची वाढत असलेली संख्या पाहता प्रत्येक वाहनाच्या गतीला लॉक करायला हवे. महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या बसेसची स्पीड लॉक असते. त्याचे अनेक फायदे होतात. मग खाजगी वाहनांची गती मोकळी का ठेवली जाते? जे वाहनचालक कर्तव्यावर असतात, ते वेळ वाचावा म्हणून वाहतूक नियम पायदळी तुडवितात. समजा अपघात झाला तर गुन्हा दाखल होतो अन् आरोपी चालकाला तातडीने सूचनापत्र देत सोडलेही जाते. एवढा कायदा तकलादू असल्याने कुठल्याही चालकाला दुसऱ्यांची पर्वा राहिलेली नाही. येथेच आपले गणित चुकत आहे. कारचालकांसाठी सीट बेल्ट असतो. दुचाकीने जाणाऱ्यांना हेल्मेट असते. मग ऑटो चालकांसाठी कुठलीही सुरक्षा नाही असे का व्हावे? ऑटोचेही अपघात आज वाढले आहेत. ऑटो उलटणे ही स्वाभाविक प्रक्रिया आहे. तीनचाकी असल्याने तो कुठेही उलटतो. विशेष म्हणजे ऑटोचालकांना वाहतूक नियमांचे पालन करणे अनिवार्य नसावे. अन्यथा त्यांनी वारंवार सिग्नल तोडण्याचे महापाप केलेच नसते. ऑटोचालक मागून येणाऱ्यांचा विचार न करता कुठेही थांबतात. परिणामी मागचा त्यांच्या ऑटोवर धडकतो आणि अपघातग्रस्त होतो. अशावेळी ऑटोचालक आपली चूक झाकून अपघातग्रस्तालाच दोष देतो. गोंदिया जिल्ह्यात सडक अर्जुनी परिसरात शिवशाही बसचा नुकताच अपघात झाला. या घटनेत ११ लोकांचा जीव गेला. हा अपघात आरोपी प्रणय उल्हास रायपूरकर या चालकाकडून घडला. विशेष सांगायचे झाल्यास प्रणयच्या हातून यापूर्वीच ६ चुका घडल्या आहेत. तरीही त्याला संबंधितांनी चक्क निर्दोष सोडले. याचा अर्थ यंत्रणा कुठेतरी आतमध्ये पोखरलेली तर नाही ना? याचाही शोध घ्यावा लागेल. दरम्यान, घरोघरी अन्नपदार्थ पोहोचविणारेही वाढले आहेत. गरमागरम खाद्यपदार्थ ग्राहकाला मिळावे म्हणून डिलिव्हरी करणारे वाहतूक नियम पायदळी तुडवितात. त्यांच्याही कृतीने अपघात वाढले आहेत. आजचा जमाना स्पर्धेचा आहे. त्याचा अर्थ चंद्रावर जायचा नाही. पण बहुतांश चालक चंद्रावरच जायचे आहे, असे वागत वाहन चालवितात. प्रश्न हा पडतो की, त्या वाहनचालकांना नेमकी कशाची घाई असते? याचा शोध घेतलाच पाहिजे. वाहनाची आणि चालविण्याची क्षमता असो किंवा नसो रस्त्याने जाणारे वायुवेगानेच वाहन चालवितात. वस्तुतः त्यांनी वाहन चालविताना आपल्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी आणि आई-वडील आहेत याचा विचार करायला हवा. पण का कुणास ठावूक आपल्या मागे कुत्राच लागला असे समजून ते वाहन चालवितात. नागपूर शहर पोलिसांनी दुचाकीवरील दोघांना हेल्मेटसक्ती केली आहे. पण हीच पोलिस यंत्रणा वेगाने वाहन चालविणाऱ्यांच्या विरोधात काहीच करीत नाही. त्यांना केवळ शासकीय आणि आपली तिजोरी भरायची आहे. या तिजोरी भरण्याच्या लक्ष्यामुळे मूळ हेतूच भरकटून गेला आहे. संपूर्ण महाराष्ट्र अपघातमुक्त करायचा असेल तर पोलिसांनी हेल्मेटसक्तीच्या मागे न लागता. वेगाने समोर जाणाऱ्यांवर, मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांवर, सिग्नल तोडणाऱ्यांवर अद्दल घडेल अशी कारवाई करावी. एवढेच नव्हे तर रस्त्यावर वाहन पार्क करणारे, हातठेले लावणारेही अपघातासाठी कारणीभूत ठरतात. त्यांच्यावर प्रशासन काही कारवाई करीत नाही. शेवटी पोलिसांचा हेतू प्रामाणिक असेल तर ते नक्कीच यावर विचार करून कृती करतील. पण त्यांना केवळ तिजोरीच भरायची असेल तर मग मात्र ब्रह्मदेव आला तरी सुधारणा शक्य नाही.

## शिष्यवृत्तीच्या लाभासाठी ऑनलाईन नोंदणी आवश्यक

### शाळांनी ऑनलाईन नोंदणी करण्याचे समाज कल्याण विभागाचे आवाहन, तीन हजार शाळांनी केली नोंदणी

सोलापूर - अनुसूचित जाती प्रवर्गासह इतर जातींच्या विद्यार्थ्यांना प्री-मॅट्रिक शिष्यवृत्ती दिली जाते. या योजनेसाठी शाळांनी ऑनलाईन नोंदणी करावी, अशा सूचना जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने दिल्या होत्या. त्यानुसार आतापर्यंत ३ हजार २०० शाळांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. अनुसूचित जाती प्रवर्गासह इतर पात्र पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी प्रारंभी शाळांची ऑनलाईन नोंदणी करण्यात येणार आहे. मात्र याकडे जिल्ह्यातील ७०० पेक्षा जास्त शाळांच्या मुख्याध्यापकांनी या महत्वाच्या प्रक्रियेकडे दुर्लक्ष झाले आहे.

दरम्यान, संबंधित शाळांकडून ऑनलाईन नोंदणी करण्यात आली नाही. त्यामुळे त्या शाळेतील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. आत्तापर्यंत ज्या शाळांची ऑनलाईन नोंदणी झाली आहे अशा शाळेतील शिष्यवृत्तीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात येणार आहे. त्यासाठी समाजकल्याण विभागाकडून लवकरच पत्र काढण्यात येणार असल्याची माहिती समाजकल्याण विभागाने दिली आहे.

## सोलापूर जिल्हयामध्ये राष्ट्रिय लोकअदालत; ६४० जुन्या प्रकरणासह एकुण १९८३१ प्रकरणे सामंजस्याने निकाली १० जोडप्यांचे वैवाहिक संबंध सामंजस्याने पुर्नस्थापित

सोलापूर : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली, महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशाप्रमाणे दि. १४ डिसेंबर २०२४ रोजी सोलापूर जिल्हयातील सर्व न्यायालयामध्ये चौथे राष्ट्रिय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय लोकअदालत सोलापूर जिल्हयातील एकुण १९८३१ प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. लोकअदालतीच्या माध्यमातून एकुण रक्कम रु.७१,०५,१४,६०५/- इतके मुल्य असणाऱ्या प्रकरणांमध्ये सांमजस्याने तडजोड करण्यात आली.

चौथ्या राष्ट्रीय लोकअदालतीचे उद्घाटन मा. श्री. मो. सलमान आझमी, अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश, सोलापूर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी जिल्हा न्यायाधीश श्री. जे. जे. मोहिते, जिल्हा सरकारी वकिल ॲड. प्रदिपसिंग रजपूत, सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष श्री. अमित आळंगे, सोलापूर महानगरपालिका उपायुक्त श्री. आशिष लोकरे, सहाय्यक पोलीस अधिक्षक श्री. सुधीर खिराडकर, सहाय्यक पोलीस अधिक्षक श्री. राजन माने, भारतीय स्टेट बँकेचे वरिष्ठ शाखाधिकारी श्री. अनिकेत फले, विधीज्ञ श्री. व्ही. एन. देशपांडे आणि जिल्हा न्यायालय प्रबंधक श्रीमती. पल्लवी पैठणकर, विधीज्ञ, पक्षकार आधी उपस्थित होते. सोलापूर जिल्हा न्यायालय तसेच सोलापूर जिल्हयातील सर्व तालुक्यातील न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोकअदालत घेण्यात आले. राष्ट्रिय लोकअदालत मध्ये ४४२०१ प्रलंबित प्रकरणे, दाखलपुर्व ९४५२५ प्रकरणे ठेवण्यात आली होती. यापैकी प्रलंबित ५०६२ प्रकरणांमध्ये तडजोड झाली आणि १४७६९ दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीच्या पार्श्वभुमिवर निकाली काढण्यात आली. राष्ट्रीय लोकअदालतमध्ये सोलापूर मुख्यालयाच्या ठिकाणी पॅनल प्रमुख म्हणून जिल्हा न्यायाधीश जे. जे. मोहिते, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर आर. यु. नागरगोजे, दिवाणी न्यायाधीश, श्रीमती. एस. ए. आर. सैयद, दिवाणी न्यायाधीश, पी. पी. पेठकर, दिवाणी न्यायाधीश, न्यायदंडाधिकारी श्रीमती. डी. डी. कोळपकर, न्यायदंडाधिकारी श्रीमती. पी. व्ही. चव्हाण, न्यायदंडाधिकारी श्रीमती. एस. पो. मर्डेकर, न्यायदंडाधिकारी श्रीमती. व्ही. व्ही. रजपूत कुलकर्णी, न्यायदंडाधिकारी श्री. एस. पी. पाटील, न्यायदंडाधिकारी श्री. व्ही. एम. रेडकर, न्यायदंडाधिकारी श्री. व्ही. पी. कुंभार यांनी काम पाहिले. पॅनल सदस्य म्हणून लोकअभिरक्षक कार्यालयातील लोकरक्षक श्रीमती. स्नेहल राऊत, एस. एम. झुरळे, एम. बी. सोलनकर, रेवण पाटील, जी. बी. नवले तसेच व्ही. व्ही. कुर्ले, श्रीमती. डी. व्ही. किणगी, श्री. एस. आर. शेंडगे आदींनी काम पाहिले. चौथे राष्ट्रीय लोकअदालत यशस्वी करण्याकरीता पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सोलापूर महानगरपालिका आयुक्त श्रीमती. शितल तेली उगले, उपायुक्त आशिष लोकरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशादिन शेळकंदे, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचे अधिक्षक अभियंता सुनिल माने, शहर वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुधीर खिराडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने यांचे मोलाचे सहकार्य लाभले राष्ट्रीय लोकअदालत यशस्वी करण्यासाठी जिल्हा न्यायालय, सोलापूर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजनापूर्वी दि. ०९ डिसेंबर २०२४ ते दि. १३ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये सोलापूर जिल्हयातील सर्व न्यायालयामध्ये विशेष मोहिम राबविण्यात आली. विशेष मोहिमेमध्ये ४० वर्षे जुनी ०२, ३० वर्षे जुनी ३, २० वर्षे जुनी १, १५ वर्षे जुनी २४, १० वर्षे जुनी १२८, ५ वर्षे जुनी ८८० व इतर अशी एकुण ३३०० प्रकरणे निकाली काढण्यात आली.

## कै.सुभाषराव किसनराव मिसाळ यांचे निधन



सोलापूर शहरातील समाजातील जेष्ठ व प्रतिष्ठित नागरिक कै.सुभाषराव किसनराव मिसाळ यांचे ता.१५/१२/२०२४ रोजी दुःखद निधन झाले.मोदी स्मशानभूमी येथे अंत्यविधी करण्यात आले .

## रमेश उंबरकर यांचे निधन

पंढरपूर तील जुने नामांकित सराफ रमेश उंबरकर वय ६८ यांचे आज सोमवार १६/१२/२०२४ रोजी राहत्या घरी निधन झाले त्यांचे अंत्यविधी पंढरपूर स्मशानभूमी येथे करण्यात आले पंढरपूर सराफ असोसिएशनच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली

## प्रभू श्रीराम कथा, नामजप व अखंड हरिनाम सप्ताह

पंढरपूर (प्रतिनिधी) : श्री गुरू बाबासाहेब आजरेकर महाराज व वै.प.पू.वासुदेव महाराज चवरे गुरूजी यांच्या तिसऱ्या पुण्यतिथिनिमित्त व गुरूवर्य ह.भ.प.सुधाकर इंगळे महाराज यांच्या अभिष्टचिंतनानिमित्त पंढरपूर येथील श्री विठ्ठल रूक्मिणी सभामंडप येथे प्रभु श्रीरामकथा, नामजप व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती श्री गुरू आंबेकर उर्फ आजरेकर फडाचे फडप्रमुख ह.भ.प.भागवत चवरे महाराज व उत्तराधिकारी ॲड.ह.भ.प.कृष्णा महाराज चवरे यांनी दिली.

या कार्यक्रमास माजी आमदार प्रशांतराव परिचारक, आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, संजय दौंड, कल्याणराव काळे, ह.भ.प.गहिनीनाथ महाराज औसेकर, ह.भ.प.एकनाथ महाराज दिवाणजी, तसेच श्री समस्त वारकरी, फडकरी दिंडी समाज संघटना, वारकरी संप्रदाय पाईक संघ, अखिल भाविक वारकरी मंडळ, श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा दिंडी समाज संघटना सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

कलश पूजन कार्यक्रमास ह.भ.प.मदन महाराज हरिदास सदस्य विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, दिपप्रज्वलन सचिन इथापे, प्रांत अधिकारी, श्रीमद भागवत कथा पूजन राजेंद्र शेळके, कार्यकारी अधिकारी, विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, प्रतिमा पूजन मनोज श्रोत्री,नायब तहसिलदार तथा व्यवस्थापक श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, गाथा पूजन शिवाजीराव कादबाने, डेप्युटी कलेक्टर, मुंबई, कथा सांगता ॲड.उमेश मराठे, जेष्ठ विधिज्ञ,सोलापूर, नामजप सांगता लक्ष्मण शिरसट,माजी नगराध्यक्ष,पंढरपूर व काकासाहेब म्हेत्रे पंढरपूर.

अखिल भाविक वारकरी मंडळाचे ह.भ.प.सुधाकर इंगळे महाराज यांची दररोज दुपारी २ ते ५ प्रभू श्रीराम कथा संपन्न होणार आहे.

दैनंदिन कार्यक्रम-सकाळी ९.३० ते १०.३० नामजप, १०.३० ते १२.३० संगीत भजन, १२.३० ते २ भोजन व विश्रांती, २ ते ५ प्रभु श्री राम कथा, ७.१५ ते ९.१५ हरिकिर्तन तसेच जागर संपन्न होईल. हा कार्यक्रम मार्गशीर्ष कृ.३,शके १९४६ बुधवार दि.१८ डिसेंबर ते मार्गशिर्ष कृ.१० शके १९४६ बुधवार दि.२५ डिसेंबर २०२४ पर्यंत संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमामध्ये ह.भ.प.पांडुरंग घुले महाराज श्री क्षेत्र देहू यांना वारकरी सेवा भूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

हे पत्र मुद्रक सोमनाथ नवनाथ शिंदे यांनी प्रकाशक सचिन हरी आदापुरे व मालक सचिन हरी आदापुरे यांचे करीता दर्लिंग ग्राफिक्स, जुना बस स्टँड शेजारी, दर्शन उद्योग भवन, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथे छापून घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर येथून प्रकाशित केले. संपादक : सचिन हरी आदापुरे, घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर मो.नं.९८५००२७६४३ (या अंकात प्रसिध्द झालेल्या मजकुरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्ष-पंढरपूर)

printed by SOMNATH NAVNATH SHINDE and published by SACHIN HARI ADAPURE and on behalf of SACHIN HARI ADAPURE printed at DARLING GRAPHICS, near old bus stand, darshan udyog bhavan , pandharpur, Dist - Solapur and published by Nath chouk pandharpur Editor : Sachin Hari Adapure, House No 1225, Nath chouk, Pandharpur Mob.9850027643

# निवडून आलेले रायगडावर जाणारे राज्यातील पहिले आमदार

## माढा मतदारसंघात परिवर्तनाची सुरुवात छत्रपतींच्या स्मारकाने होणार : आमदार अभिजीत पाटील

## आमदार अभिजीत पाटील यांनी घेतले रायगडावर छत्रपती शिवरायांचे दर्शन आणि वंशज यांची भेट

पंढरपूर प्रतिनिधी / – मुंबई येथील तीन दिवसीय विधिमंडळाच्या अधिवेशनानंतर माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी स्वराज्याची राजधानी गाठली आणि छत्रपतींच्या गादीसमोर नतमस्तक झाले.

निवडून आल्यानंतर रायगडावर जाणारे राज्यातील पहिले आमदार अभिजीत पाटील हे आहेत.

रायगडाच्या पावन स्थळावर छत्रपतींचा राज्याभिषेक झाला होता. याच ठिकाणी स्वराज्याचा संकल्प पूर्ण केला होता. या ठिकाणी छत्रपतींचे अनेक वर्ष वास्तव होते. या पवित्र ठिकाणी जाऊन आमदार अभिजीत पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेतले.

यावेळी अभिजीत पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की छत्रपतींनी हजारो मावळे घडवले आणि स्वराज्याची संकल्पना रुजवली. त्यांच्या प्रेरणेने पुढील पिढ्या घडल्या मराठा साम्राज्याने बलाढ्य शक्तींना परास्त करत अटकेपार झेंडा रोवला. संपूर्ण महाराष्ट्र स्वराज्याच्या आदर्श संकल्पनांवर उभा राहिला आहे.

मला देखील माढा विधानसभेची मिळालेली जबाबदारी एक मावळा म्हणून पूर्ण करायची आहे.असा संकल्प करून आमदार अभिजीत पाटील यांनी छत्रपती शिवरायांच्या चरणी अर्पण करून आर्यशीर्वाद घेतल्याच्या भावना व्यक्त केल्या.

ते पुढे बोलताना म्हणाले की माढा मतदारसंघात या परिवर्तनाची सुरुवात छत्रपतींच्या स्मारकाने होणार आहे. माढा मतदारसंघात छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकही अश्वारूढ पुतळा नाही ही खंत कोणाच्याही मनात राहू देणार नाही असा विश्वास दिला. आमदार अभिजीत पाटील यांनी रायगडावर छत्रपतींचे दर्शन



घेतल्यानंतर स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडाचा इतिहास जाणून घेत असताना. महाराजांचे वंशज संभाजीराजे छत्रपती हे देखील योगायोगाने रायगडावर आले होते. यावेळी अभिजीत पाटील यांनी त्यांची आवर्जून भेट घेतली तसेच रायगडावर सुरू असलेल्या संवर्धन कार्याबाबत चर्चा केली. कोणतीही पूर्व सूचना न देता अचानक झालेली भेट आनंददायी ठरली असल्याच्या भावना आमदार पाटील यांनी व्यक्त केल्या.

याप्रसंगी त्यांचे रायगड दर्शन सुरू असताना एका ठिकाणी शाळेतील विद्यार्थी इतिहास जाणून घेत असताना त्यांना दिसले.

त्यामधील एका शिक्षकांनी आमदार अभिजीत पाटील यांना ओळखले आणि संवाद साधला. यावेळी त्यांनी विद्यार्थी आणि योगायोगाने भेट झालेले स्वराज्याचे वंशज यांच्याशी संवाद साधता आल्याचा आनंद व्यक्त केले. यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी रायगडावर इतिहास जाणून घेण्यासाठी काढलेल्या अशा संस्कारित सहलीसाठी शिक्षकांचे अभिनंदन करत त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजीराजे छत्रपती आणि भविष्यातील अनेक बालक छत्रपती यांची एकत्रित भेट म्हणजे इतिहास वर्तमान आणि भविष्य याचे एकत्रित दर्शन घेऊन नवी ऊर्जा घेऊन परतलो असल्याच्या भावना यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी व्यक्त केल्या.

## पंढरपूर येथील श्री गणेश रुग्णसेवा मित्र मंडळ, पंढरपूर संचलित निवासी मूकबधीर विद्यालय, पंढरपूर मधील २ दिव्यांग विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

पंढरपूर : जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दि.१२ व १३ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हा परिषद सोलापूर, समाज कल्याण विभाग आयोजित क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत निवासी मूकबधीर विद्यालय,पंढरपूर जि.सोलापूर या शाळेतील विद्यार्थ्यांनी जनरल चॅम्पियन ट्रॉफी (उत्तेजनार्थ) बक्षीस पटकावली आहे.



सदर स्पर्धेमध्ये विद्यालयातून १४ विद्यार्थी,विद्यार्थिनी यांनी सहभाग नोंदवला. यामध्ये हर्षद गेजगे (गोळा फेक प्रथम क्रमांक),दिपक इंगोले (लांब उडी प्रथमक्रमांक व १०० मी धावणे द्वितीय क्रमांक),समर्थ भाग्यवंत ( ५० मी धावणे द्वितीय क्रमांक),धनश्री गायकवाड (१०० मी धावणे तृतीय क्रमांक),श्रावणी पाटील (गोळाफेक द्वितीय क्रमांक) पटकावला. तसेच सांस्कृतिक कला गुणांना वाव देताना शिव तांडव हे गीत कर्णबधीर मुलां–मुलींनी उत्कृष्टरित्या सादर केले.

सदर क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धे करिता मुख्याध्यापिका बडवे व इतर शिक्षक–शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष प्रशांत परिचारक व चेअरमन रा.पा. कटेकर व सर्व संचालक यांनी दिव्यांग विद्यार्थी–विद्यार्थिनीचे अभिनंदन केले.




## आपटे उपलप प्रशालेच्या दिव्यांग विद्यार्थ्यांचे स्पर्धेत सुयश

पंढरपूर : वि.वि. मंडळ पंढरपूर संचलित आपटे उपलप प्रशाला पंढरपूरच्या दिव्यांग– अंध विद्यार्थ्यांनी समाजकल्याण विभाग, जिल्हा सोलापूर यांच्या वतीने १२ व १३ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा गौरव प्रशस्तीपत्र व पदक प्रदान करून करण्यात आला.

स्पर्धेत यशस्वी ठरलेले विद्यार्थी:

१) पवन संजय प्रक्षाळे (इयत्ता ९वी) – लांब उडी

२) रामनाथ सोलंकर (इयत्ता ९वी) – ५० मीटर धावणे

३) वैष्णवी सोनटक्के – लांब उडी व ५० मीटर धावणे

या सत्कार समारंभाला शाळेचे मुख्याध्यापक श्री. दत्तात्रेय धारूरकर, पर्यवेक्षक श्री. अनिल अभंगराव, क्रीडा विभागाचे श्री. गुलाखे सर, श्री. एन. पी. डांगे सर, श्री. कुसुमडे सर, श्री. खरात सर, श्री. करकमकर सर, सौ. सर्वगोड मॅडम व सौ. कुलकर्णी मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. थिटे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. खरात सर यांनी मानले. बक्षीस वितरणात, श्री. धारूरकर, श्री. अभंगराव, श्री. गुलाखे व श्री. एन. पी. डांगे श्री सितापराव यांचा सहभाग होता. मुलींच्या गटातील पारितोषिक वितरण सौ. सर्वगोड व सौ. कुलकर्णी मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या कर्तृत्वाबद्दल संस्थेचे सचिव मा. श्री. बी.जे.डांगे सर यांनी विशेष कौतुक केले व त्यांना पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या.

## नवजीवन अपंग शाळेचे यश

पंढरपूर – जागतिक दिव्यांग दिनी जिल्हा परिषद सोलापूर यांच्यावतीने आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतीक कार्यक्रमामध्ये पंढरपूर येथील निवासी अपंग शाळेतील विद्यार्थ्यांनी ६ सुवर्णपदक, ८ रौप्यपदक तर ५ कास्यपदक पटकावून यश संपादन केले.

स्पर्धेमध्ये श्रवण जाधव, विशाल रणदिवे, निलम घुंबरे, अनिता बाबर, संजिवनी रणदिवे, किर्तीध्वज कातूरे, कौंडन्य शिवशरण, चैतन्य भिसे, यश पाटील, वैभव आजनाळकर, सत्यजीत खंदारे, ओंकार शिवपूजे, अभिमन्यु फरांदे, गणेश रोकडे, सुदिप गायकवाड, पायल बंदपट्टे, श्रावणी मेटकरी या विद्यार्थ्यांनी यश मिळविले. विद्यार्थ्यांचे समाजकल्याण अधिकारी सचिन कवले, शशीकांत ढेकळे, मुख्याध्यापक मोहन थोरात यांनी अभिनंदन केले आहे. कार्यक्रमाकरीता धनाजी बाबडे, शंकर आयरे, धनंजय करंडे अमृतलिंग वाडे, लता पवार यांनी परिश्रम घेतले. जागतिक दिव्यांग दिनी जिल्हा परिषद सोलापूर यांच्यावतीने आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतीक कार्यक्रमामध्ये पंढरपूर येथील निवासी अपंग शाळेतील विद्यार्थ्यांनी ६ सुवर्णपदक, ८ रौप्यपदक तर ५ कास्यपदक पटकावून यश संपादन केले.

## चार्मस् ग्रुपला कमलकांत पुरस्कार प्रदान

पंढरपूर – येथील श्री संत तनपुरे हाराज मातोश्री वृद्धाश्रमास चार्मस् ग्रुप पुणे यांच्यातर्फे कै.डॉ.आनंद यादव यांच्या स्मृतीप्रित्यर्थ देण्यात येणारा कमलकांत पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी ग्रुपचे अध्यक्ष लक्ष्मीकांत विठ्ठलराव पाचारणे, संत तनपुरे महाराज संस्थेचे विश्वस्त ह.भ.प.अनंत महाराज तनपुरे, नायब तहसीलदार नागनाथ माळवदकर, जयेश कसबे, मृणालिनी कसबे उपस्थित होते. यावेळ पाचारणे यांनी, चार्मस् ग्रुपच्या माध्यमातून आजपर्यंत २३ सामाजिक संस्थांना कमलकांत पुरस्कार दिला असून आजपर्यंत ६० हजार विविध पुस्तकांचे वाटप केले आहे. मातोश्री वृध्दाश्रम गोपळपूर यांना चिकणसूप या पुस्तकांच्या ६१ आवृत्ती भेट दिल्या आहेत. आभार धनंजय राक्षे यांनी मानले.

## पंढरपूरात ५ जानेवारी २०२५ रोजी स्वाभिमानी मराठा महासंघाचे पहिले अधिवेशन

### पंढरपूर येथे महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची माहिती

पंढरपूर (प्रतिनिधी) : स्वाभिमानी मराठा महासंघाचे राष्ट्रीय पहिले अधिवेशन पंढरपूर येथे दि. ५ जानेवारी २०२५ रोजी येथील मोरारजी कानजी धर्मशाळा येथील कार्यालयात होणार असल्याची माहिती स्वाभिमानी मराठा महासंघाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शशिकांत पाटील यांनी पंढरपूर येथील पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी स्वाभिमानी मराठा महासंघाच्या प्रदेश कार्याध्यक्ष अमृताताई पठारे,दक्षता कमिटी प्रदेशाध्यक्ष शिवशंभूप्रिया झांबरे,पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्ष अलकाताई सोनवणे,महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख ओंकार निंबाळकर, जिल्हाध्यक्ष महेंद्र नाईक निंबाळकर,लहू सातपुते,अनिल बागल,लखन घाडगे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना शशिकांत पाटील म्हणाले की पंढरपुरात होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनासाठी वेगवेगळ्या राज्यातून



मराठा,कुर्मी,पटेल,जाट, पाटीदार उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनात मराठा आरक्षण, शेतीमालाला हमी भाव,गडकिल्ले संवर्धन,छत्रपती शिवरायांचे अरबी समुद्रातील स्मारक यासह विविध विषयांवर विचार मंथन होणार आहे.

पंढरपुरात पार पडणाऱ्या पहिल्या राष्ट्रीय अधिवेशनासाठी स्वाभिमानी मराठा महासंघाचे संस्थापक डॉ.कृषिराज टकले–पाटील, राष्ट्रीय अध्यक्ष स्वराज्य भुषण एम के बीएन आर सागर,राष्ट्रीय कार्याध्यक्ष निलेश धुमाळ पाटील,महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्ष दिपक दादा पवार,महिला आघाडी प्रदेश अध्यक्ष अनिताताई पाटील,दक्षता आघाडी प्रदेश अध्यक्ष शिवशंभू प्रिया जांभळे,प्रदेश कार्याध्यक्ष महिला आघाडी अमृता पठारे, पश्चिम महाराष्ट्र महिला आघाडी अध्यक्षा अलका ताई सोनवणे,पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सिताताई जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती शशिकांत पाटील यांनी दिली.

याप्रसंगी आलेल्या सर्व स्वाभिमानी मराठा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेऊन मराठा आरक्षण मिळावे, मराठा समाजाचे सर्व प्रश्न सुटावे आणि अधिवेशन यशस्वी व्हावे यासाठी साकडे घातले असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली.

अधिवेशनादरम्यान मराठा समाजाची पंढरपूरची वारी या माध्यमातून पंढरीच्या मालकाला मराठा समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी साकडं घालण्यात येणार आहे. सोलापूर जिल्हा अध्यक्ष महेंद्र निंबाळकर यांच्या माध्यमातून मराठा समाज जोडो अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी प्रमुख पदाधिकाऱ्यांनी दिली.

# रेल्वे अधिकाऱ्यांसोबत केला रेल्वेतून प्रवास आ.अभिजीत पाटील यांचा रेल्वे प्रश्नाला हात

पंढरपूर (प्रतिनिधी): कोणतीही गोष्ट करण्यासाठी सकारात्मक भावना लागते.मतदार संघातील रेल्वेचे प्रश्न सोडवण्यासाठी आ. अभिजीत पाटील यांनी रेल्वे अधिकाऱ्यांसोबत रेल्वेतून प्रवास केला. याच ठिकाणी चर्चा केली.अधिकाऱ्यांनी ही या सकारात्मक प्रतिसाद दिला. पंढरपूर- मुंबई रेल्वे दररोज करण्यासह,अनेक प्रश्नांना त्यांनी हात घातला.

माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील हे विधानसभा सदस्य पदाची शपथ घेतल्यानंतर,स्वराज्याची राजधानी रायगड येथे छत्रपतींच्या गादीसमोर नतमस्तक झाले होते. यावेळी त्यांनी माढा मतदारसंघात परिवर्तनाची सुरुवात छत्रपतींच्या स्मारकाने होणार असल्याचे जाहीर करून, माढा मतदारसंघाच्या विकासाचा संकल्प केला होता. अल्पावधीतच कर्तव्यदक्ष आमदार म्हणून ओळखले जाणारे अभिजीत पाटील यांनी, शुक्रवारी कुर्डूवाडी येथे वार्षिक स्टेशन इन्स्पेक्शन संदर्भात आलेले मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर धर्मवीर मीना यांची भेट घेऊन, मतदार संघातील विविध



ठिकाणी रेल्वे सुविधेबाबत सविस्तर चर्चा करून जनहिताच्या मागण्या मांडल्या. यावर रेल्वे अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने लवकरच मतदार संघातील रेल्वेबाबतच्या सर्व सुविधा नागरिकांना मिळणार आहेत.

याप्रसंगी रेल्वे अधिकाऱ्यांसोबत झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत,माढा विधानसभेचे आमदार पाटील यांनी मतदार संघातील मोडनिंब येथे कार्गो टर्मिनल बाबत सविस्तर चर्चा केली. या कामाची अंतिम टप्प्यातील प्रक्रिया वेगाने सुरू आहे. हे काम पूर्ण करावे. यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा माल कमी वेळेत आणि कमी खर्चात बाजारपेठेपर्यंत पोहोचविण्यास सहकार्य होईल, असा विश्वास दिला.

यावेळी त्यांनी माढा - वडशिंगे महातपूर उड्डाणपुलाबाबत मागणी केली. त्यातील दोन पूल बांधणीबाबत मान्यता मिळाली असुन,एकाचे सर्वेक्षण करण्याचे आश्वासन रेल्वे अधिकाऱ्यांनी दिले.

तसेच माढा रेल्वे सुशोभीकरण करण्याबाबत तसेच स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, प्रतिक्षालय (वेटिंग रूम) अशा सर्व सुविधा करण्याची मागणी केली. याचबरोबर पंढरपूर - मुंबई आठवड्यातून तीन वेळा रेल्वे आहे, ती रोज सुरू करावी अशी मागणी केली. प्रत्येक शनिवार रविवार मुंबई ते पंढरपूर - टू टायर -थ्री टायर डबे वाढवावे, अशी मागणी केली.

माढा रेल्वे स्टेशनवर कोरोना काळाच्या आधी सर्व रेल्वे गाड्या थांबत होत्या, परंतु आता फक्त दोनच गाड्या थांबतात. पूर्वीप्रमाणे सर्व गाड्या थांबल्यास, सर्व प्रवाशांची सोय होईल. याबाबत सविस्तर चर्चा करून मागणी करण्यात केली.

कोरोना काळाच्या आधी सांगोला येथे कृषी रेल्वे सुरू होती. ती आता बंद आहे , ती पुन्हा सुरू करावी, रेल्वे परिसरातील सर्व जागा विकसित करण्याबाबत सकारात्मक चर्चा केली.




# अंतर महाविद्यालयीन कराटे स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे यश

पंढरपूर प्रतिनिधी - पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर महाविद्यालयीन कराटे स्पर्धेत येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वयत्त महाविद्यालयाने घवघवीत यश प्राप्त केले. ही स्पर्धा व्ही.जी शिवदारे कॉलेज आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स सोलापूर येथे नुकतीच पार पडली. या स्पर्धेत विद्यापीठातील एकूण १४ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या चार विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

आणि त्या चार ही विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

६१ किलो वजनी गटात सृष्टी पवार बीए भाग तीन हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्यामुळे तिचे चेन्नई येथे होणाऱ्या ऑल इंडिया वेस्ट झोन कराटे स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर ५० किलो वजन गटात रितेश शिंदे याने प्रथम क्रमांक प्राप्त केला. , ५५ किलो वजन गटात अतुल चव्हाण याने तृतीय क्रमांक प्राप्त केला., ५५ किलो वजन गटात आदित्य चव्हाण याने चौथा क्रमांक प्राप्त केला.

या सर्व यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन. प्राचार्य डॉ.सी. जे खिलारे, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईक नवरे, उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकवळस, उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे .

शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अनिल परमार, प्रा. विठ्ठल फुले, प्रा. मनोज खपाले या सर्वांचे मार्गदर्शन लाभले .

# बॅलेट पेपर नको फक्त ईव्हीएमवर मतदान घ्या, लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायतमध्ये ठराव

पंढरपूर - सध्या देशामध्ये आणि महाराष्ट्र राज्यांमध्ये चालू असलेल्या ईव्हीएम मशीनच्यासंदर्भात वेगवेगळे मतप्रवाह सुरु आहेत. याबाबत अनेक ठिकाणी विरोध दर्शवित तक्रारी सुरू आहेत.मात्र, पंढरपूर शहरालगत असलेल्या टाकळी ग्रामपंचायत सदस्यांकडून मात्र बैठकीत समर्थनार्थ एकमत झाल्याचे दिसून आले असून, याबाबतचा ठराव मंजूर करून घेण्यात आलेली राज्यातील पहिली ग्रामपंचायत लक्ष्मी टाकळी ठरली आहे.

लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत सदस्याच्या बैठकीत ईव्हीएम मशीनच्या समर्थनार्थ गुरुवार, १२ डिसेंबर रोजी एकमुखाने ठराव करून घेतला आहे.

या ग्रामपंचायतमध्ये महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सत्ता असून, या ठिकाणी शिंदेसेनेचे सरपंच संजय साठे व भाजपचे उपसरपंच संदीप सोनवणे, अशी महायुतीची सत्ता आहे.

सध्या ईव्हीएम मशीनच्या संदर्भात चालू असलेले तक्रारीसंदर्भात राज्यामध्ये प्रथमच लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायतने ईव्हीएम मशीनच्या समर्थनाथ राज्यामध्ये पहिला ठराव एकमताने मंजूर केला आहे.

यावेळी झालेल्या बैठकीसाठ सरपंच संजय साठे,ग्रामपंचायत सदस्ट औदुंबर ढोणे, नंदकुमार वाघमारे नागरबाई साठे, आशाबाई देवकते रेश्मा साठे, रोहिणी साठे,मार्ज उपसरपंच महादेव पवार,माजी सरपंच विजयमाला वाळके, समाधान देटे सुरेखा खपाले, शीतल कांबळे, रुक्मिर्ण जाधव, गोवर्धन देठे यांच्यासह सव गावांतील इतर नागरिक व ग्रामसेवक जयंत कुमार खंडागळे व कर्मचार उपस्थित होते.

# श्रेयश शिखरे याची विज्ञान प्रदर्शनामध्ये जिल्हास्तरीय निवड



पंढरपूर : पंढरपूर तालुका विज्ञान प्रदर्शनामध्ये श्री दर्लिंग विद्या मंदिर व भास्कर आप्पा गायकवाड कनिष्ठ महाविद्यालय, चळे येथील इयत्ता ८ वीतील विद्यार्थी श्रेयश दत्तात्रय शिखरे याने तयार केलेल्या अल्कोहोल डिटेक्टर या वैज्ञानिक उपकरणाची जिल्हा स्पर्धे साठी निवड झाली आहे. या स्पर्धकांना विज्ञान शिक्षक श्री लक्ष्मीप्रसाद मोहिते यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थाध्यक्ष हरीषदादा गायकवाड, प्राचार्य जे.बी. गायकवाड, सर्व शिक्षक ,शिक्षकेतर वृंद आणि विद्यार्थी यांनी श्रेयश शिखरेचे तसेच या प्रदर्शनामध्ये सहभागाबद्दल प्रतिक मोहन वाघ याचेही अभिनंदन आणि कौतुक केले, तसेच प्रशालेतर्फे त्याचा सत्कार करण्यात आला.

# दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया पंढरपूर यांच्यावतीने यशवंत भीमराव आंबेडकर जयंती साजरी

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया पंढरपूर यांच्या वतीने यशवंत भीमराव आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सरवदे परिवाराकडून व भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पूजन करण्यात आले भारतीय बौद्ध महासभा तालुकाध्यक्ष समाधान जाधव व शहराध्यक्ष राहुल सर्वगोड यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून पंचशील ग्रहण करण्यात आले.

हनमंत बंगाळे भारतीय बौद्ध महासभा सोलापूर जिल्हा कोषाध्यक्ष यांनी भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाविषयी देत असताना असे सांगितले कीभैय्यासाहेबांचे लिखाण तर्कशुद्ध आणि विचारगर्भ असे. त्यांच्या लिखाणातील व भाषणातील विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे म्हणी आणि वाक्यप्रचार यांचा मोठया प्रमाणावर वापर असे.

भैय्यासाहेबांनी बाबासाहेबांची अनेक स्मारके उभारली. *बौध्दजन पंचायत समितीचे १ ले स्मारक त्यांनी मुंबई येथे बांधले. या डॉ.आंबेडकर सभागृहाचे भूमिपूजन दि.२-४-१९५८ ला व उद्घाटन २२-६-१९५८ ला झाले. मुंबई नागरिकांच्या वतीने कफ परेड येथे बाबासाहेबांचा पुतळा बसविण्याचे ठरले. भैय्यायासाहेबांनी आग्रह धरला की २६ जानेवारी १९६२ रोजीच पुतळ्याचे अनावरण झाले पाहिजे. म्हणून शेवटच्या क्षणी कमी पडत असलेली रक्कम महापौरांना दिली व ठरल्याप्रमाणे २६ जानेवारी १९६२ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल प्रकाश यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण झाले. चवदार तळे क्रांतीचे स्मारक म्हणून जेथे मनुस्मृतीचे दहन करण्यात आले. त्या जागेवर अशोक स्तंभाच्या धर्तीवर क्रांतिस्तंभ उभारण्यासाठीही यशवंतरावांनी पुढाकार घेतला. येवढे काय तर नागपूर ची दिक्षा भूमीची जागा मिळवून तेथे समिती गठीत करून आले. चैत्यभूमीच्या रूपाने बाबासाहेबांचे स्मारक व्हावे म्हणून भारतीय बौद्ध महासभेने दि.२०-३- १९५७ रोजी इचड कडे ४० बाय ४० ची जागा मागितली इचड ने ८ बाय ८ ची जागा मंजूर केली. परंतु मागणीपेक्षा एक इंचही कमी जागा घेणार नाही असा पवित्रा भैय्यासाहेबांनी घेतला. अखेर इचड ळाींशिाशपीं लोळींशश ने ४० बाय ४० ची जागा मान्य केली. या प्रसंग डॉ. बाबासाहेबांचे जीवन कार्याचे प्रतीक म्हणून एक 'भीमज्योत' महू ते मुंबई या ठिकाणी आणण्याचे ठरविले. २७-३-१९६६ रोजी ही भीम-ज्योत भारताचे तत्कालीन मजूर मंत्री जगजीवनराम यांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली. ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार दादासाहेब गायकवाड होते. भीम-ज्योत महू हून इंदौर, भोपाळ, हुशंगाबाद, बैतूल, नागपूर, पुलगाव, औरंगाबाद, येवला, नाशिक, हरेगावनगर, संगमनेर, देहूरोड, पुणे, सातारा, वणी, पाचगणी, महाबळेश्वर, खेड, मंडणगड, दापोली, महाड, पेण, पनवेल, कल्याण, ठाणे, मुलुंड, राजगृहवरून दादरच्या चैत्यभूमीला आणण्यात आली. ह्या भीमज्योतीदरम्यान मिळालेल्या धम्म दानातून चैत्यभूमी स्मारक उभारण्यात



आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर भैय्यासाहेब भारतीय बौद्ध महासभेचे दुसरे अध्यक्ष झाले. भारत बौद्धमय करीन' हा बाबासाहेबांचा संकल्प उराशी घेऊन भय्यासाहेबांनी काम सुरु केले. त्यांनी धम्मदीक्षेचे अनेक कार्यक्रम घेतले, धम्म परिषदा भरविल्या, धम्म मेळावे सर्वत्र होत होते. प्रचार सर्वत्र जोरात सुरू केला भय्यासाहेब आमदार असतांना त्यांनी विधानपरिषदेत बौद्धांच्या हक्कांबद्दल हिरीरीने बाजू मांडली तसेच या नवीन बौद्धांच्या सवलतीविषयी ते पंतप्रधान मोरारजी देसाईंना भेटले होते.

भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी श्रीलंका, थायलंड, म्यानमार, सारनाथ व दिल्ली येथे झालेल्या जागतिक बौद्ध परिषदांमध्ये भारतीय बौद्धांच्या समस्या मांडल्या. खेड्यापाड्यातील बौद्ध विहारांचे उद्घाटन केले.

१९६८ साली मुंबई येथे धम्म परिषद भरविण्यात आली व प्रमुख पाहुणे म्हणून दलाई लामा यांना बोलविण्यात आले. ह्या धम्म परिषदेमध्ये अनेक महत्त्वाचे ठराव पारित करण्यात आले. त्यात संस्कार विषयक आचार संहिता सर्वानुमते मान्य करण्यात आली. 'बौद्ध जीवन संस्कार पाठ' या नावाचे पुस्तक तयार करण्यात आले. धम्म प्रसार कार्याचा एक भाग म्हणून १९६७ मध्ये ११ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनी भय्यासाहेबांनी स्वतः श्रामणेरची दीक्षा घेतली व त्या कालावधीत ते चैत्यभूमीतच राहत होते. त्यांचे नाव 'महापंडित काश्यप' असे ठेवण्यात आले होते. १९५९ मध्ये महास्थविर संघरक्षित लंडनहून आले होते. त्यांनी भय्यासाहेबांची भेट घेतली होती.

महापुरुषाच्या पोटी जन्म घेऊन स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी किती कठोर परिस्थितीचा सामना करावा लागतो याचा प्रत्यय भैय्यासाहेब आंबेडकरांना निश्चितच आला होता.

भैय्यासाहेबांना कधीही घमेड नव्हती. भैय्यासाहेबांचा स्वभाव शांत होता. शिवाय शारीरिक व्याधीमुळे सुद्धा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव टाकला होता. संधिवाताचा सामना करतांना सोसावे लागलेले दुःख त्यांनी कधी सामाजिक जीवनात उतरू दिले नाही.

भैय्यासाहेबांनी राजकीय स्वार्थाचा त्याग केला. धम्मकार्य केले जे काही आज भारतात बौद्धांची संख्या वाढलेली आहे. ती भैय्यासाहेबांनी केलेल्या प्रयत्नांचाच परिपाक आहे.

१९६२ ला भैय्यासाहेबांचा ५० वा वाढदिवस साजरा केला गेला होता. तेव्हा त्यांच्या सन्मानार्थ दादासाहेब गायकवाडांनी काढलेले गौरवोद्गार अतिशय बोलके आहे. दादासाहेब गायकवाड म्हणाले होते, 'भैय्यासाहेब माझ्यासारख्या आंधळ्यांची काठी आहेत'. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वारसत्व लाभलेले भैय्यासाहेब चळवळीत इतरांचे काठी बनले. चळवळीत इतरांना सहकार्य केले. चळवळीला दिशा देण्याचे काम केले. पण कधीही स्वतःचे नेतृत्व समाजावर लादले नाही. नेतृत्व संघर्षापासून सदैव स्वतःला अलिप्त ठेवले. भैय्यासाहेब हे दादासाहेब गायकवाडांच्या खांद्याला खांदा लावून सदैव त्यांच्या पाठीशी राहिले.

कार्यक्रमाचे सांगता आर. वाय. सुरवसे यांनी शरणतय गाथा घेऊन केली कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समता सैनिक दलाचे सैनिक आकाश वाघमारे यांनी सहकार्य केले.